दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र • मंगळवार दि.३ डिसेंबर २०२४ • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष २ रे • अंक -९८ • पाने ४ • किंमत ४ रुपये

## सर्व बातम्या निराधार,मी सत्तेत कोणत्याही मंत्रिपदाच्या शर्यतीत नाही-श्रीकांत शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)**-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीतून माघार घेतली आहे. त्याबदल्यात शिवसेनेला उपमुख्यमंत्री पद मिळणार असून त्यासाठी श्रीकांत शिंदे यांच्या नावाची चर्चा रंगली होती. यावर खुद्द श्रीकांत शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. माझ्या उपमुख्यमंत्री पदाबाबतच्या सर्व बातम्या निराधार आणि बिनबुडाच्या आहेत. त्यात कोणतेही तथ्य नाही, असे श्रीकांत शिंदे यांनी सोशल मीडिया एक्सवर पोस्ट करत सांगितले. श्रीकांत शिंदे यांच्या स्पष्टीकरणामुळे त्यांच्या उपमुख्यमंत्री पदाबाबतच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.महायुतीच्या सरकारचा शपथविधी थोडा लांबल्यामुळे सध्या चर्चा आणि अफवा यांचे पीक फोफावले आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे दोन दिवस गावी जाऊन विश्रांती घेतली. त्यामुळे अफवांना अधिकच बहर आला. मी उपमुख्यमंत्री होणार अशा बातम्या प्रश्नचिन्हे टाकून गेले दोन दिवस दिल्या जात आहेत. वस्तूतः यात कोणतेही तथ्य नसून माझ्या उपमुख्यमंत्री पदाबाबतच्या सर्व बातम्या निराधार आणि बिनबुडाच्या आहेत, असे स्पष्टीकरण एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी दिले

# भाजपकडून एकनाथ शिंदेंची कोंडी करण्याचा प्रयत्न आमदार बच्चू कडू यांचे वक्तव्य,राजकीय वर्तुळात चर्चा

**अमरावती (वृत्तसंस्था)**
भारतीय जनता पक्षाकडून तुमची कोंडी करण्याचा प्रयत्न होईल, असे मी एकनाथ शिंदे यांना अनेकवेळा सांगितले असल्याची माहिती आमदार बच्चू कडू यांनी दिली आहे. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू असून एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा आहे. यावर आमदार बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

आमदार बच्चू कडू म्हणाले, मी एकनाथ शिंदे यांना सांगितले होते, बऱ्याचवेळा सांगितले होते की भारतीय जनता पक्षाकडून तुमची कोंडी करण्याचा प्रयत्न होईल. कारण एकनाथ शिंदे हे एकमात्र मुख्यमंत्री असे होते की रात्री दोन वाजता देखील सर्वसामान्य माणसांना भेटायचे. असा पहिला मुख्यमंत्री मी पाहत होतो. त्यामुळे भाजपला कधीकाळी असे वाटले होते की एकनाथ शिंदे यांना आपण थोडे दाबून ठेऊ, असे बच्चू कडू म्हणाले आहेत.पुढे बच्चू कडू म्हणाले, एकनाथ शिंदे सत्तेत असल्याने त्यांना दाबून ठेवणे शक्य झाले नाही. मात्र, एकनाथ शिंदे यांचे काम बोलत होते. त्यामुळे एकनाथ शिंदे यांची कोंडी करण्याचा प्रयत्न होणार होता. कारण भाजपला एकहाती सत्ता घ्यायची आहे, असे बच्चू कडू म्हणाले आहेत.दरम्यान, महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमताने यश मिळाले आहे. मात्र, निवडणुकीचा निकाल लागून आता आठ दिवस होऊन गेले तरी देखील अद्याप सरकार स्थापन झाले नाही. मुख्यमंत्री पदावरून महायुतीमध्ये मतभेद असल्याचे बोलले जात आहे. तसेच मुख्यमंत्री पद नाही तर गृहमंत्री पद देण्याची मागणी शिंदे गटाकडून केली जात आहे. मात्र, यास देखील भाजपचा विरोध असल्याचे दिसत आहे.सरकार स्थापनेसाठी पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार दिल्लीत गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेण्यासाठी जाणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र, एकनाथ शिंदे हे प्रकृतीच्या कारणास्तव या बैठकीला जाणार नसल्याचे समोर आले आहे. एकनाथ शिंदे सध्या ठाणे येथील त्यांच्या निवासस्थानी विश्रांती घेत आहेत.



# राष्ट्रीय काँग्रेसच्या जिल्हा सरचिटणीस पदी रेखा बनसोडे यांची नियुक्ती



**नायगाव | प्रतिनिधी**
गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक चळवळीत मोलाचे योगदान देऊन गोरगरीब दलित बहुजन अल्पसंख्यांक वर्गांना न्याय देण्याचे ज्यांनी काम केले त्यांच्या या कार्याची दखल घेऊन शेळगाव छत्री येथील श्रीमती रेखा बनसोडे देवकर यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षांच्या नांदेड जिल्हा सरचिटणीस पदी पक्षाचे जिल्हाध्यक्ष मा.आ. हनमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी नियुक्ती केली असून निवडीचे पत्र नवनिर्वाचित खा.प्रा.रवींद्र वसंतराव पाटील चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आले.

प्रमाणिक पणाने व पारदर्शकपणे सामाजिक काम केले की त्या कामाची बढती राजकीय रूपात होते मौजे शेळगाव छत्री येथील श्रीमती रेखा हरिबा बनसोडे देवकर हे सामाजिक कार्यात अग्रेसर असल्याने त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांच्या मान्यतेनुसार रेखा देवकर यांची नांदेड जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती जिल्हाध्यक्ष मा आ.हनमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी केली असून पक्षाच्या ध्येय धोरणा नुसार काम करावे तसेच सर्व समाजाच्या व जाती-धर्माच्या घटकांना सोबत घेऊन व पक्षशिस्त पालन करून नांदेड जिल्ह्यात काँग्रेस पक्षांचे संघटन मजबूत करावे अशा आशयाचे निवडीचे पत्र नवनिर्वाचित खा. रवींद्र वसंतराव पाटील चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी रेखा बनसोडे यांचे सर्व स्तरातून स्वागत व अभिनंदन होत आहे.

# महाविद्यालयांमध्ये विद्यार्थीच येत नाहीत तर प्राध्यापकांनी शिकवावे कोणाला?

**छ. संभाजीनगर | प्रा संजय तुपे**
विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेश घेत असले तरी वर्गात येत नाहीत. १४ वर्षांच्या अध्यापनाच्या काळात १०० ताससुद्धा विद्यार्थ्यांच्या अभावी घेता आले नाहीत, अशी खंतच अधिसभा सदस्याने बैठकीत मांडली. त्याचवेळी महाविद्यालयांसह विद्यापीठांमधील अध्र्यापेक्षा अधिक प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहेत. तरीही विद्यापीठांसह महाविद्यालये सुरू आहेत. हे फक्त भारतातच होऊ शकते, असा टोलाही मारण्यात आला. अनुदानित आणि विनाअनुदानितच्या उत्तरपत्रिका तपासण्यासह इतर कामांवरही जोरदार खडाजंगी झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा फुले सभागृहात शनिवारी पार पडली. प्र कुलगुरू डॉ. वाल्मीक सरवदे यांच्यासह अधिसभा सदस्य, अधिकारी उपस्थित होते. प्रश्नोत्तरांच्या तासात सदस्य डॉ. भास्कर साठे यांनी चालू शैक्षणिक वर्षात विद्यापीठातील विभागांमध्ये प्रवेश कमी झाल्याचा प्रश्न उपस्थित केला. त्यावर डॉ. उमाकांत राठोड यांनी उच्च शिक्षणातील भीषण वास्तवच मांडले. विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांमध्ये २ टक्के विद्यार्थीही दररोज महाविद्यालयात येत नाहीत. तेव्हा प्राध्यापकांनी शिकवायचे कोणाला, असा सवाल केला. परीक्षा झाल्यानंतर तपासण्यासाठी प्राध्यापकांवरच विनाअनुदानित उत्तरपत्रिका अनुदानित येतो. ताण महाविद्यालयातील नेमणुका निव्वळ कागदोपत्रीच

**'नॅक ए प्लस' मानांकनाबद्दल अभिनंदनाचा ठराव**


विद्यापीठास नॅकचे ए प्लस' मानांकन प्राप्त झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्यासह सहकाऱ्यांच्या अभिनंदनाचा ठराव अधिसभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला. डॉ. भगवानसिंग ढोभाळ यांनी हा प्रस्ताव मांडला. त्यास डॉ. मुंजा धोंडगे व केदार राहणे यांनी अनुमोदन दिले.

असल्याचे सांगितले. तेथे परवानगी घेण्यापुरतेच प्राध्यापक नेमतात. त्यानंतर विनाअनुदानित महाविद्यालयांत काहीच नसते, असेही त्यांनी सांगितले. त्यावर प्रा. सुनील मगरे यांनी आक्षेप नोंदवला. सरसकट विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये काहीच होत नाही, हा आरोप चुकीचा असल्याचे सांगितले, ज्या महाविद्यालयांत काहीच होत नाही, त्यांची नावे जाहीर करण्याचे आवाहन केले. अनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापक तीन-तीन लाख रुपये पगार घेतात व महाविद्यालयात जाऊन डबे अधिसभेतून राज्याच्या विविध आयोग, मंडळावर निवड झालेल्या सदस्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव डॉ. नरेंद्र काळे यांनी मांडला. ॲड. सुभाष राऊत यांची राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी, प्रा. हरिदास सोमवंशी यांची एचएससी बोर्ड सदस्यपदी व गोविंद देशमुख यांची बियाणे महामंडळ सदस्यपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. खाऊन परत येतात. विद्यार्थी महाविद्यालयात येत नाहीत, हे प्राध्यापकांचे अपयश असल्याचेही प्रा. मगरे यांनी सांगितले. त्यावर दोन्ही बाजूंकडून जोरदार आक्षेप घेण्यात आले. गोविंद देशमुख, डॉ. नरेंद्र काळे, डॉ. मुंजा धोंडगे, डॉ. योगिता होके पाटील, छत्रभुज गोडबोले, दत्ता भांगे आदींनी मते मांडली. शेवटी कुलगुरूंनी विद्यार्थी आले पाहिजेत, त्या दृष्टीने प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजेत, असे स्पष्ट करीत वादावर पडदा टाकला. बैठकीत २१ विषयांना मंजुरी देण्यात आली. बैठक २ तासांमध्ये आटोपली.

# हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या सोलापूर जिल्हा अध्यक्ष पदी चोपडे

**सोलापूर | प्रतिनिधी**
हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या पदाधिऱ्यांची ऑनलाईन बैठक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या अक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी यांनी प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या सहमतीने हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या सोलापूर जिल्हा अध्यक्ष पदी विश्वास चोपडे यांची नियुक्ती केली.हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या सोलापूर जिल्हा अध्यक्ष पदी विश्वास चोपडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी, प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बालाजी अडियाल, प्रदेश उपाध्यक्ष प्रा संजय तुपे, प्रदेश महासचिव विनोद भोकरे, विदर्भ प्रवक्ता सय्यद जावेद, महाराष्ट्र प्रदेश मिडिया प्रभारी अमजद पठाण, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य धनंजय तरारे, विदर्भ विभागीय अध्यक्ष मो. तारेक शेख, मराठवाडा विभागीय अध्यक्ष शेख वसिम आझाद, नागपूर जिल्हा अध्यक्ष देवेंद्र मुरकुटे, बुलढाणा जिल्हा अध्यक्ष मिर्झा अक्रम बेग, बदनापूर तालुका अध्यक्ष इलियास बेग, घनसावंगी तालुका अध्यक्ष अशोक घुमरे, संदिप देवडे, अविनाश मेश्राम आदिंनी त्यांचे अभिनंदन केले.






# राजकारण हे असंतुष्ट आत्म्यांचा महासागर आज नगरसेवकापासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वचजण दु:खी-नितीन गडकरी यांच्या विधानाची चर्चा

**नागपूर (वृत्तसंस्था)**
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आपल्या रोखठोक विधानांसाठी कायमच चर्चेत असतात. सध्या राज्यात सुरू असलेल्या राजकीय परिस्थितीवरही त्यांनी भाष्य केले. नितीन गडकरी यांनी राजकारणाला 'असंतुष्ट आत्म्यांचा महासागर' अशी उपमा दिली आहे. राजकारणात प्रत्येक व्यक्ती दु:खी असतो आणि नेहमीच सध्याच्या पदापेक्षा वरच्या पदाची आकांक्षा बाळगतो, असेही ते म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळे चर्चांना उधाण आले आहे.




नागपूर येथे रविवारी 'जीवनाचे ५० स्वर्णिय नियम' या पुस्तकाचे नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात त्यांनी सध्या राज्यात सुरू असलेल्या घडामोडींवर रोखठोक भाष्य केले. राजकारणात महत्त्वाकांक्षा कशी वाढली आहे, याची व्याख्याही त्यांनी केली.

नितीन गडकरी म्हणाले, राजकारण संतुष्ट आत्म्यांचा महासागर आहे. राजकारणात सर्वच लोक दु:खी आहेत. नगरसेवकाला नाराज असतो कारण त्याला आमदार होता नाही आले. एक आमदार यासाठी नाराज असतो कारण त्याचा मंत्रिमंडळात समावेश झाला नाही. मंत्री दु:खी असतो कारण त्याला चांगले खाते भेटत नाही आणि ते मुख्यमंत्री होऊ शकले नाही. तर मुख्यमंत्री देखील तणावात असतो कारण पक्षश्रेष्ठी त्यांना कधी ठेवतील आणि बाजुला करतील याची त्याला भीती असते, असे वक्तव्य नितीन गडकरी यांनी केले.


पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले, जीवन हा तडजोडी, मजबुरी, अडथळे आणि विरोधाभासांचा खेळ आहे. कौटुंबिक, सामाजिक, राजकीय किंवा कॉर्पोरेट जीवन असो, जीवन आव्हाने आणि समस्यांनी भरलेले असते. त्यांचा सामना करण्यासाठी आपल्याला 'आर्ट ऑफ लिव्हिंग' समजून घ्यावे लागेल.

नितीन गडकरी म्हणाले की, त्यांच्या राजकीय कारकिर्दीत त्यांना अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्या आत्मचरित्रातील एक कोट आठवतो, ज्यात म्हटले आहे की, 'माणूस जेव्हा पराभूत होतो तेव्हा तो संपत नाही. जेव्हा तो हार मानतो तेव्हा तो संपतो. नितीन गडकरी यांनी आनंदी जीवनासाठी चांगल्या मानवी मूल्यांवर आणि संस्कारांवर भर दिला. जीवन जगण्यासाठी आणि यशस्वी होण्यासाठी त्यांनी आपले आदर्श आणि नियम सांगताना 'व्यक्ती, पक्ष आणि पक्ष तत्त्वज्ञान' याचे महत्त्व अधोरेखित केले.



संपादकीय

# प्रसाद असावा सात्त्विक!



विविध धर्मीयांच्या प्रार्थनास्थळांमध्ये प्रसादातील नानाविध प्रकारच्या पदार्थांचा समावेश असतो. कोणत्या स्वरूपामध्ये भाविकांना प्रसाद देण्यात यावा, याला काही निश्चित निकष नाही. भाविकांसाठी मंदिरांसह प्रार्थनास्थळांमध्येही जेवणाचीही सुविधा असते. प्रसाद कशा स्वरूपामध्ये द्यावा, असे कोणतेही निश्चित निकष नाहीत. वातावरणातील बदल, भाविकांची वाढती गर्दी, मंदिराला मिळणारी आर्थिक मदत, दान याचाही परिणाम प्रसादाच्या स्वरूपावर होत असतो, याकडे जाणते लक्ष वेधतात. काही ठिकाणी मंदिरामध्ये, प्रार्थनास्थळी प्रसादाचे वितरण केले जाते, तर अनेक ठिकाणी प्रार्थनास्थळांच्या बाहेर भाविकांना प्रसाद दिला जातो. हा प्रसाद कधी देवाला द्यायच्या फुलानारळाच्या ताटामध्ये असतो, तर कधी भाविकांना घरी नेण्यासाठी वेगळा दिला जातो. या प्रसादाचीही गुणवत्ताचाचणी करणे गरजेचे आहे. मात्र ती केली जात नाही.

**वेगळा विचार नाही**

मंदिरातून देण्यात येणारा प्रसादाच्या गुणवत्तेचा तपासणीच्या निकषावर वेगळा विचार केला जात नाही. अन्नपदार्थ म्हणून त्याकडे पाहिले जाते. प्रसाद तयार करताना त्यामध्ये कोणते घटकपदार्थ वापरले जातात याची तपासणी होत असते. उदा. तूप, साखर, रवा, मैदा, बेसन यांसारख्या घटक पदार्थांची गुणवत्ता काय आहे, हे तपासून पाहिले जाते. घटक पदार्थांची गुणवत्ता तपासली म्हणजे तयार होणारी अंतिम पदार्थांची, प्रसादाची गुणवत्ता चांगलीच असेल, असा निश्चित अंदाज बांधला जातो. मात्र प्रक्रियेमध्ये पूर्णपणे तयार झालेल्या प्रसादाची गुणवत्ताही तपासायला हवी, असा आग्रह तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. हा प्रसाद कोणत्या ठिकाणी ठेवला जातो, त्याची साठवणूक कशी होते, साठवणुकीचा मुदत कालावधी किती आहे, त्या कालावधीमध्ये प्रसादाचे वितरण केले जाते का, याकडे अत्यंत गांभीर्याने पाहायला हवे. मुदतबाह्य प्रसाद आरोग्यासठी अपायकारक ठरू शकतो. प्रसाद तयार करताना साजूक तूप, दूध वा दर्जेदार दुग्धजन्य पदार्थांऐवजी निकृष्ट दर्जाच्या पदार्थांचा वापर करणे आरोग्यासाठी अपायकारक ठरू शकते. त्यामुळे एका ठोस व निश्चित नियमावलीची गरज प्रसादासाठी आहे, अशी मागणी आता पुढे येत आहे.

**अन्ननिरीक्षकांची नियुक्ती**

तिरुपती वादाच्या पार्श्वभूमीवर आता राज्यातील काही प्रार्थनास्थळांमध्ये अन्ननिरीक्षकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. अन्नशास्त्रामध्ये प्रावीण्य असलेल्या सदस्यांची समिती स्थापन करणे, नियमित तपासणी करणे, प्रसाद तयार करण्यापासून ते त्याचे पॅकिंग करेपर्यंत सर्व सूचनांची अंमलबजावणी प्रभावीपणे केली जाते का, हे अन्ननिरीक्षकांच्या माध्यमातून तपासण्यात येणार आहे. मंदिर तसेच प्रार्थनास्थळी येणाऱ्या भाविकांच्या आरोग्यासह त्यांच्या श्रद्धेचीही जपणूक यामुळे होणार आहे. महाप्रसाद तसेच कोरड्या प्रसादाची गुणवत्ता निश्चित करण्यासाठीही याची मदत होणार आहे. मंदिरामध्ये लावण्याच्या दिव्यांसाठी चांगल्या प्रतीचे तेल व तूप वापरले जाते का, याची खातरजमा करण्यासाठीही अन्ननिरीक्षकांची मदत होणार आहे.

**भोग उपक्रमाची मदत**

प्रार्थनास्थळांमार्फत वितरण केल्या जाणाऱ्या या प्रसादाचा दर्जा सुधारावा आणि त्याची गुणवत्ता कायम राहावी, यासाठी अन्न व प्रशासनाने 'भोग' हा प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत या प्रार्थनास्थळांवरील प्रसादाची गुणवत्ता तपासणे, त्याठिकाणी वापरण्यात येणाऱ्या पाणी, प्रसादासाठी वापरण्यात येणाऱ्या घटक पदार्थांची तपासणी करणे तसेच प्रसाद आणि इतर पदार्थ तयार करताना स्वच्छतेच्या निकषांचे पालन होते का, याचीही तपासणी होणार आहे. प्रसाद तयार झाल्यानंतर वैद्यकीय पद्धतीनेही त्याची तपासणी करण्यात येणार आहे. सध्या राज्यातील २४ प्रार्थनास्थळांमध्ये 'भोग' उपक्रमाअंतर्गत प्रसाद प्रमाणित करण्यात येणार आहे.

**प्रयोगशाळांची व्याप्ती वाढवण्याची गरज**

अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळांवर अन्न आणि औषधांच्या चाचण्या करण्यासंदर्भात असलेला ताण दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक ठिकाणचे अन्न तसेच औषधांचे नमुने चाचणीअभावी प्रलंबित आहेत. तज्ज्ञ कुशल मनुष्यबळाचा अभाव यामुळे या प्रसादाची गुणवत्ता चाचणी करण्याचे अतिरिक्त काम कसे घ्यायचे, हा प्रश्न प्रशासनातील तज्ज्ञांनी उपस्थित केला. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने निश्चित नियमावली व निकषांसाठी मार्गदर्शन करावे व त्याची अंमलबजावणी देशात एकाच पद्धतीने होते का, हे तपासावे अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

# वित्ताचे तंत्रज्ञान, तंत्रज्ञानातील वित्त



'मूळ माहिती', 'संकलित माहिती', 'नोंदवलेली माहिती' असे काळानुरूप माहितीचे प्रकार पडले आहेत. या माहितीचा 'केवळ संकलित माहिती' अर्थात डेटा हा एक प्रकार. हा प्रकार विद्यार्जन, तंत्रार्जन आणि अर्थार्जन यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. डेटा ही आजच्या जगातली सर्वात मौल्यवान मत्ता (असेट) आहे, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. आपल्या देशात झालेल्या डिजिटल पेमेंट क्रांतीचा फार मोठा आधार हा डेटा आहे. या डेटाला योग्य पद्धतीने मार्गस्थ करण्याचं, त्याच्या संरक्षणासाठी सज्ज राहण्याचं आणि त्याच्या साह्याने आपलं जीवन सुकर करण्याचं तंत्रज्ञान आज आपण स्वतः तयार करत आहोत. या तंत्रज्ञानाचा वापर आपण 'डिजिटल पेमेंट' हा दोन अक्षरी मंत्र सिद्ध करण्यासाठी करतोय. हे तंत्रज्ञान म्हणजेच वित्त-तंत्रज्ञान अर्थात 'फिनटेक' होय. देशात फिनटेकला यंदा दोन दशकं पूर्ण होत आहेत. जगात फिनटेक क्षेत्रात समर्थपणे वावरणाऱ्या देशांमध्ये भारताचा क्रमांक तिसरा आहे. फिनटेकमध्ये आपल्या देशात नऊ हजार कंपन्या कार्यरत असून या क्षेत्रात छोट्या-मोठ्या कंपन्यांनी ५८.२० अब्ज डॉलरची गुंतवणूक केली आहे. आपल्याला गरीब राष्ट्र, तिसऱ्या जगातलं राष्ट्र असं आजही हिणवणाऱ्या देशांना आपल्या फिनटेक प्रगतीनं आपण तोंडात बोटं घालायला लावलं आहे. देशातली स्थिती पाहिली तर लक्षात येईल, की आपण फिनटेकचा स्वीकार जगातील फिनटेक स्वीकाराच्या तुलनेत ८७ टक्के केला आहे. दोन व्यवसायांमधले व्यवहार (बीटूबी), दोन व्यवसाय व ग्राहक यांच्यातले व्यवहार (बीटूबीटूसी), दोन ग्राहकांमधले व्यवहार (सीटूसी) अशा अनेक आघाड्यांवर आपण आज फिनटेक वापरत आहोत.

**करोनाची इष्टापत्ती**

इंग्रजीमध्ये लश्रश्रीीळपस ळप वळीसीळीश असा वाकप्रचार आहे. करोनाचा संसर्ग आणि त्यातून करावे लागलेलं लॉकडाउन हे भारतीय फिनटेकसाठी लश्रश्रीीळपस ळप वळीसीळीश ठरलं. घरातून बाहेर पडताच येत नाही आणि नित्य गरजेच्या वस्तूंचा पुरवठा होणं तर गरजेचं आहे, अशा विचित्र परिस्थितीत काहीशा नाईलाजाने आपण मोबाइलच्या साह्याने पेमेंट पद्धत स्वीकारली. त्यावेळी पेमेंट क्षेत्रात आपण काहीतरी भव्यदिव्य करत आहोत याची कल्पना ही सेवा तयार करणाऱ्यांना आणि तिचे वापरकर्ते आपण यांना कदाचित आली नसावी. यथावकाश मात्र त्यावाचून आपलं सगळीकडे अडायला लागलं. फिनटेकचा स्वीकार हा असा नाईलाजाने का होईना केला गेला आणि आज तो आपल्या जीवनाचं अविभाज्य अंग बनलाय. युनिफाइड पेमेंट इंटरफेस किंवा यूपीआय आठ वर्षांपूर्वी अस्तित्वात आलं. त्याची भरभराट करोना काळात झाली असं म्हणावं लागेल.

**फिनटेकचा 'दादा' देश**

नुकतीच ग्लोबल फिनटेक फेस्ट ही तीन दिवसांची जागतिक परिषद मुंबईत झाली. या परिषदेत ८०० ते एक हजार कंपन्यांनी दालनं उभारली होती, ज्यातून फिनटेकचं दिमाखदार प्रदर्शन मांडलं गेलं. यामुळे फिनटेक क्षेत्रात आपला प्रभाव दिसून आला. कंपन्यांबरोबरच फिनटेक धोरणकर्ते, नेते, स्टार्टअप, कल्पक उद्योजक यांचाही यात सहभाग होता. जागतिक परिप्रेक्ष्यातून या घटनेकडे पाहिल्यास भारताचं वर्चस्व या क्षेत्रात निर्माण झालंय हे अधोरेखित झालं.युरोप आणि अमेरिका हे प्रदेश आर्थिक देवाणघेवाणीच्या बाबतीत अजूनही धनादेशासारख्या पारंपरिक साधनांना चिकटून आहेत. भारतातला यूपीआयचा उदय, स्वीकार, प्रसार आणि त्याची उपयोगिता (जी काळाच्या कसोटीवर उतरली आहे.) ही स्पष्ट दिसू लागल्यावर आता युरोप आणि अमेरिका या प्रदेशांकडून 'यूपीआय आम्हालाही द्या' अशी मागणी होऊ लागली आहे. डिसेंबर २०१९मध्ये अमेरिकेची मध्यवर्ती बँक असलेल्या यूएस फेडरल रिझर्व्हच्या संचालक मंडळाला गुगल कंपनीने सल्लाच दिला, की यूपीआयची कार्यपद्धती समजावून घ्या आणि तसं काहीतरी अमेरिकेत देखील आणा! २०११मध्ये आपल्या देशात सर्वसामान्य नागरिकांकडून रोकडविना अदायगीचे (नॉन कॅश पेमेंट) केवळ सहाच व्यवहार झाले, पण त्याच वर्षात किरकोळ दुकानांतून कार्डाने पेमेंटचे एक कोटी व्यवहार झाले. लोक रोकड टाळून कार्डाकडे वळत आहेत हे एक तर रिझर्व्ह बँकेच्या लक्षात आलं आणि लक्षात आलं सायबर चोरांच्या! डेबिट असो की क्रेडिट, कोणत्याही कार्डाचं क्लोनिंग करता येतं हे उघड झालं आणि मग मात्र विनाकार्ड पेमेंट व्यवहार आवश्यक वाटू लागले. या गरजेतून विनारोकड पेमेंटसाठी एक स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध होणं आणि ती सर्वसामान्यांसाठी उपलब्ध होणं, त्यातही ती नागरिकांच्या मोबाइलमध्ये उपलब्ध होणं ही काळाची गरज बनली. या सगळ्या विचारमंथनातून २००९मध्ये स्थापन झालेल्या नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशनने (एनपीसीआय) यूपीआय विकसित केलं. यूपीआय सुपर-डुपर हीट झालंय.

**भारतीय फिनटेकची वैशिष्ट्ये**

आपलं फिनटेक हे सर्वसमावेशक आहे. या फिनटेकचा मुख्य आधार यूपीआय हा आहे. यूपीआय हा विनारोकड पेमेंटसाठी एक मंच आहे आणि या मंचावर अनेक प्रणाली सहजगत्या लाँच करता येतात. उपयुक्त फिनटेक बाजारात आणल्यास केंद्र सरकारही मदत करण्यासाठी उत्सुक आहे. अद्यापही बँक शाखेत प्रत्यक्ष न जाता घरबसल्या मोबाइलवरून आर्थिक व्यवहार करण्यासाठी लोक घाबरताना दिसतात. विशेषतः ग्रामीण भागात स्त्रियांना ही भीती जाणवत असते. फिनटेक देशात आणखी यशस्वी करायचं असेल तर समाजाच्या सर्व स्तरांमध्ये याविषयी पुरेशी जागृती करणं गरजेचं आहे. एकंदर डिजिटल इकोसिस्टिमबाबत लोकांच्या मनात असलेली शंका लवकरात लवकर फिटणे गरजेचे आहे. वापरकर्त्यांच्या भाषेत बोलणाऱ्या आणि वापरण्यास अत्यंत सोप्या अशा सुविधा तसंच अशी अप हे आपल्या फिनटेकचं सर्वात मोठं वैशिष्ट्य आहे.

**फिनटेकसमोरील आव्हाने**

पुढचं दशक हे फिनटेकसाठी अत्यंत महत्त्वाचं आहे. अर्थात हे वाक्य दरवर्षी म्हटलं तर हे दशकही एकेक वर्षानं पुढे जाईल. त्यामुळे २०२४ पासून २०३५पर्यंतचा काळ भारतीय फिनटेकसाठी फार महत्त्वाचा आहे, असं म्हटल्यास चुकीचं ठरणार नाही. या काळात भारतीय फिनटेकसमोरील आव्हानांचा विचार केला तर काही ठळक आव्हाने दिसतात –

१. स्थानिक पातळीपासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पेमेंट व्यवहार करताना ते विविध देशांच्या पेमेंट पद्धतींना सामावून घेणारे असे करणे हे मोठं आव्हान आहे. सध्या ज्याला आपण क्रॉस बॉर्डर म्हणतो, तसे व्यवहार करताना अडचणी येत आहेत. यूपीआय हा जर सर्व डिजिटल व्यवहारांचा आधार मानला, तर हे यूपीआय आपल्या देशात वापरू देण्यासाठी अजून अनेक देश तयार नाहीत. काही ठिकाणी राजकीय आडमुठेपणा तर काही ठिकाणी तंत्रज्ञानाची अपूर्णता अशी कारणं आहेत.

२. देशात तयार होणाऱ्या फिनटेकला आंतरराष्ट्रीय स्तरावर घेऊन जाण्याचं मोठं आव्हान आपल्या कंपन्यांसमोर आहे.

३. तंत्रज्ञानाची निर्मिती करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता आहे.

४. कोणतंही फिनटेक वापरता त्या तंत्रज्ञानाने देशातील सर्व माहिती तंत्रज्ञानविषयक कायद्यांचे पालन केलेलं असणे आवश्यक आहे. तसंच हे तंत्रज्ञान वापरणाऱ्याला यापासून किती जोखीम घ्यावी लागेल तेही स्पष्ट होणे आवश्यक आहे.

५. फिनटेक पर्यावरणानुकूल असणं महत्त्वाचं आहे.

६. आर्थिक घोटाळे आणि सायबर फसवणूक ही दोन मोठी आव्हाने आज फिनटेक कंपन्यांसमोर उभी आहेत.

**काही महत्त्वाची पावले**

१. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि आर्थिक सेवा यांची एकमेकांशी सांगड घालण्यात आली आहे. त्यामुळे आता वित्तसंस्थांना बॉट, चॅटबॉट यांच्या माध्यमातून ग्राहकाशी थेट संवाद साधणं शक्य होत आहे. यामुळे डिजिटल व्यवहाराची सुरक्षितता वाढली आहे.


२. रिझर्व्ह बँकेकडून सेंट्रल बँक डिजिटल करन्सी अर्थात ई-रुपयाचा वापर नागरिकांसाठी अधिक सुलभ करण्यात आला आहे. ई-रुपया ग्राहकांना देण्यासाठी एचडीएफसी बँक, कॅनरा बँक अशा काही प्रमुख बँकांना परवानगी देण्यात आली आहे. यामुळे रोकड प्रत्यक्ष बाळगण्याची जोखीम संपली आहे.

३. कार्डविरहित एटीएमला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिलं जात आहे. त्याचप्रमाणे कार्डविरहित व्यवहारांनाही चालना दिली गेली आहे.

४. बीटूबी व्यवहारासाठी भारत बिलपे ही सुविधा एनपीसीआयने आणली आहे. वापरकर्त्यांना स्वतः सर्व प्रकारची पेमेंट आपसात थेट करता यावीत यासाठी यूपीआय सर्कल ही सुविधा एनपीसीआयने बाजारात दाखल केली आहे.

फिनटेक ही काळाची गरज तर आहेच, शिवाय हे तंत्रज्ञान आता आपल्या दैनंदिन व्यवहारांचा कणा ठरलं आहे. हे तंत्रज्ञान नवं असलं आणि म्हणून ते लोभस असलं तरी ते जबाबदारीनं हाताळण्याची गरज आहे. म्हणून फिनटेकची कोणतीही सुविधा स्वीकारताना त्याविषयी पुरेशी माहिती घेणं महत्त्वाचं आहे. अशी माहिती घेताना स्वतःच्या माहितीचा कुठेही कोणाकडून दुरूपयोग केला जाणार नाही याचीही खात्री बाळगणं महत्त्वाचं आहे. अशी सर्व खबरदारी बाळगल्यास येणारं दशक हे भारतीय फिनटेकचंच असेल याच काही शंका नाही.

# जग भारताविषयी आशावादी का आहे?



जग सध्या अनेक भूराजकीय पेचप्रसंगात अडकलेलं आहे आणि महागाईच्या आगीतून बाहेर पडता पडता मंदीच्या फुफाट्यात फेकलं जातंय की काय, याची चर्चा सुरू आहे. पण अशा वेळी सर्वच देश आणि आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था भारताच्या आर्थिक प्रगतीची प्रशंसा करताना दिसत आहेत. जेपी मॉर्गन या अमेरिकेतील सर्वात मोठ्या वित्तसंस्थेचे जागतिक अध्यक्ष जेमी डिमॉन यांनी अलीकडेच त्यांच्या भारतभेटीत भाकीत केलं की या दशकाअखेर भारत सात ट्रिलियन डॉलरची उंची गाठू शकेल, तर त्यांचे कार्यकारी संचालक जेम्स सलिव्हन यांनी भारतात १०० बिलियन डॉलरच्या नवीन गुंतवणुका येऊ घातल्या असल्याचं विधान केलं. जेपी मॉर्गन जगातील ८५० मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे भारतातील व्यवहार सांभाळते आणि साहजिकच विदेशी कंपन्या आणि गुंतवणूकदार यांचा भारताकडे वळणारा कल त्यांना सगळ्यात आधी जाणवणार हे खरं. मात्र महत्त्वाचं हे आहे की, भारताविषयी आशावाद व्यक्त करणारे ते एकटेच नव्हेत.गेल्याच आठवड्यात भारत-अमेरिका स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरम या संस्थेचे अध्यक्ष तसेच सिस्को या कंपनीचे मानद अध्यक्ष असलेल्या जॉन चेंबर्स यांनी 'भारत पुढील तीन-चार दशकांत चीनला ओलांडून जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थसत्ता बनेल, आणि या शतकाच्या शेवटी आर्थिकदृष्ट्या चीनच्या जवळजवळ दुप्पट झालेला असेल,' असं भाकित वर्तवलं. गेल्या आठवड्यात आलेल्या एस अँड पी ग्लोबल या जागतिक पतमापन संस्थेच्या अहवालात भारताचा चालू वर्षाचा वृद्धिदर ६.८ टक्के तर पुढील वर्षाचा वृद्धिदर वाढून ६.९ टक्के होईल, असे म्हटले आहे. काहीच दिवसांपूर्वी डेलॉइट या वित्तसंस्थेने भारताचे वर्णन 'जगाच्या निराशाजनक पार्श्वभूमीवर आशेचा किरण' असं करताना भारत सात टक्क्यांचा वृद्धिदर कायम ठेवू शकेल, असा विश्वास व्यक्त केला होता.सप्टेंबरच्या सुरुवातीला जागतिक बँकेने भारताच्या वृद्धिदराचे अंदाज आधीच्या ६.६ टक्क्यांवरून ७ टक्क्यांवर नेले होते. अशाच प्रकारे त्याआधी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि एशियन डेव्हलपमेंट बँक यांनी देखील भारताविषयीचे अंदाज वरच्या दिशेने बदलले होते. तर मूडीज या पतमापन संस्थेनेदेखील गेल्या महिन्यात भारताविषयीच्या अंदाजात वाढ केली. 'भारतीय अर्थव्यवस्थेने व्याजदर वाढलेले असताना आणि सरकार वित्तीय तूट कमी करत असताना देखील एप्रिल-जून २०२४ तिमाहीत ७.८ टक्क्यांचा वृद्धिदर गाठला. उद्योग तसेच सेवा या दोन्ही क्षेत्रांनी भरघोस कामगिरी दर्शवली. त्यातही सेवा क्षेत्रासाठी मागणी वेगाने वाढत आहे,' अशी टिप्पणी त्यांनी केली. अशा उदाहरणांची यादी खूप मोठी आहे.

माध्यमांतून सर्वसाधारणपणे गुन्हेगारी, अपघात, राजकीय साठेमारी, बंद, मोर्चे, तणाव अशा गोष्टी प्रामुख्याने बघणाऱ्या, वाचणाऱ्या सामान्यांना कदाचित हे सगळं काहीतरी वेगळं, क्षणभंगुर, अविश्वसनीय वाटू शकेल. परंतु एकीकडे स्थानिक पातळीवर शांतता आणि सुव्यवस्था किंवा रस्ते, पाणी, वीज, सार्वजनिक स्वच्छता, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, शिक्षण, आरोग्य अशा मूलभूत सुविधांविषयी प्रश्न वाढत चाललेले असतानादेखील दुसरीकडे भारत शेतकी तसेच औद्योगिक उत्पादन, आंतरराष्ट्रीय व्यापार, रस्ते, रेल्वे, बंदरं किंवा विमानतळ यांसारख्या पायाभूत सुविधा, वाहतूक क्षेत्र, किंवा डिजिटल तंत्रज्ञानामार्फत पुरवता येणाऱ्या सेवासुविधा अशा अनेकविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रगती करतो आहे, गुंतवणूक करतो आहे. त्याचा परिणाम म्हणजे १९९० च्या सुमारास असलेलं भारतीयांचं सरासरी ३०० डॉलरचं दरडोई उत्पन्न आजमितीला २७०० डॉलरवर जाऊन पोचलं आहे. आता होत असलेली प्रगती त्यात सातत्यानं भर घालत आहे, आणि त्यातून हळूहळू सर्वसामान्यांचं जीवनमान उंचावत आहे.आज ३.५ ट्रिलियन डॉलर असलेली भारताची जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था २०२७पर्यंत तिसऱ्या क्रमांकावर पोचेल आणि २०३० पर्यंत सात ट्रिलियन डॉलरपर्यंत जाईल, अशी अपेक्षा आज व्यक्त केली जात आहे. पुढील सहा-सात वर्षांत आणखी ३.५ ट्रिलियन डॉलर्स वाढवायचे म्हणजे दरवर्षी सरासरी ५०० – ५५० बिलियन डॉलरची वाढ होत राहिली पाहिजे. आत्ताच भारत दरवर्षी ४०० बिलियन डॉलरची वाढ करत आहे, त्यामुळे हे लक्ष्य अशक्य नाही.मोठ्या प्रमाणावर नवीन पायाभूत सुविधांची निर्मिती हा भारताच्या उन्नतीचा पाया ठरत आहे. भारताने गेल्या सात-आठ वर्षांत तब्बल एक ट्रिलियन डॉलर्स एवढी गुंतवणूक पायाभूत सुविधांमध्ये केली आहे आणि तेवढीच गुंतवणूक पुढील पाच-सहा वर्षांत करणार आहे. त्यामुळेच २०१४ साली अवघ्या पाच शहरांत २५०किमीमध्ये असलेली मेट्रो आता २१ शहरांमध्ये १००० किमी मार्गावरून धावते आहे, तर पुढील १,००० किमीचे मेट्रोमार्ग बनत आहेत. विमानतळांची संख्या ७४ वरून आता १५८ झाली आहे, तर २१ नवीन विमानतळ बनत आहेत, विद्युतीकरण केलेल्या रेल्वे लाइन्स २१,००० किमी वरून ६३,००० किमी झाल्या, हायवे दुप्पट झाले, देशातल्या ९९ टक्के खेड्यांपर्यंत पक्की सडक, वीज, सिलिंडर, मोबाईल नेटवर्क, इंटरनेट इत्यादी पोहोचले आहेत.

भारताने हरित ऊर्जेच्या उत्पादनातदेखील मोठी मजल मारली आहे. गेल्या १० वर्षांत सौरऊर्जेची उत्पादन क्षमता २५ पट वाढली आहे, तर जैवऊर्जेचा वापर आठपट झाला आहे. सौरऊर्जेच्या उत्पादनात भारत आता जगातील तिसऱ्या क्रमांकाचा देश बनला आहे, तर त्यातील गुंतवणुकींसाठी भारत हा जगातील सर्वोत्तम देश गणला जात आहे.डिजिटल क्षेत्रातील भारताची क्रांती तर सर्वश्रुत आहेच. आज भारतात जगातील सर्वात स्वस्त, पण सर्वोत्तम मोबाइल इंटरनेट सेवा उपलब्ध आहे. भारत जगातील सर्वाधिक इंटरनेट वापरणारा देश बनला आहे. सरकारच्या पाठिंब्याने निर्माण झालेल्या डिजिटल सार्वजनिक सुविधा यांनी सरकारी सोयीसुविधांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचायला मदत केली असून त्याने संपूर्ण जगाचं लक्ष वेधून घेतलं आहे. त्यामुळेच भारत आज डिजिटल पेमेंटमध्ये जगात अव्वल ठरला आहे. आणि या सगळ्यांमुळे व्यापारउदिमाला चालना मिळालीच आहे, पण त्याचबरोबर प्रचंड प्रमाणावर स्टार्ट-अप्सना चालना मिळाली आहे. भारतातील स्टार्ट-अप्सची संख्या २०१४ मध्ये अवघी ४००-५०० होती ती आजमितीला १,४०,००० च्या वर गेली आहे, आणि 'युनिकॉर्न' च्या संख्येत भारत जगातील तिसरा देश बनला आहे.भारताची निर्यात वेगाने वाढते आहे आणि त्यामुळे व्यापारातील चालू खात्यातील तूट खूपच कमी झाली आहे. परकीय चलनाची गंगाजळी ओसंडून वाहते आहे आणि आंतरराष्ट्रीय बाजारात रुपया आपलं मूल्य टिकवून आहे. महागाई गेल्या पाच वर्षांतल्या नीचतम पातळीवर आहे. तर स्टेट बँकेने केलेल्या संशोधनानुसार देशांतर्गत आर्थिक विषमता देखील गेल्या आठ वर्षांत १५ टक्क्यांनी घटली आहे. अशा पद्धतीनं सर्वांगीण विकासाच्या गगनाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करताना भारताने अमेरिका, जपान, चीन आदी देशांप्रमाणे बेफिकीर आर्थिक धोरणे अंगिकारली नाहीत, हे विशेष आहे. पायाभूत सुविधांवर वाढती गुंतवणूक करताना वित्तीय तूट कमी कशी होत राहील, यासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन प्रयत्नशील आहेत. पुढील वर्षी ही तूट देशाच्या अर्थव्यवस्थेच्या ४.५ टक्क्यांपर्यंत सीमित करून कर्जांचा बोजा कमी कसा होत राहील, त्याकडे सरकारचे लक्ष असेल. अशा धोरणांमुळेच भारताची भविष्यातील वेगवान वाटचाल निष्कंटक आणि अधिकाधिक खात्रीपूर्ण होत जाईल. त्यामुळे बाहेरील लोकांनी भारतात येऊन भविष्यातील विकाससंधींचा फायदा उचलण्याआधीच आपण भारतीयांनी जमेल त्या मार्गाने स्वतःला त्यासाठी सुदृढ, सुयोग्य बनवून सहभागी होणं ही काळाची गरज आहे.

# डिजिटल मीडियातील सर्व पत्रकारांनी आज आरोग्य तपासणी करून घ्यावी-दिनकर शिंदे

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील समस्त मराठी पत्रकारांच्या स्वाभिमान आणि न्याय हक्कासाठी लढा उभारणाऱ्या मराठी पत्रकार परिषद मुंबईच्या ८६ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून राज्यभरात पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्याचे निर्देश पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी दिले आहेत. त्यानुसार मंगळवार दि. ३ डिसेंबर रोजी बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यात पत्रकार संघांच्या पुढाकाराने पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर संपन्न होणार आहेत. या शिबिरात मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सहभागी होऊन आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले आहे.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी दिलेल्या निर्देशानुसार दि ३ डिसेंबर १९३९ रोजी मराठी पत्रकार परिषदेच्या मुंबईत स्थापना दिनानिमित्त दरवर्षी राज्यभरातील पत्रकारांची स्थानिक तालुका स्तरावरील पत्रकार संघाच्या वतीने प्रत्येक तालुक्यात आरोग्य तपासणी केली जाते. मराठी पत्रकार परिषदेचा हा स्थापना दिवस राज्यात गेली दहा वर्षे पत्रकार आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी स्थानिक डॉक्टर्सच्या मदतीने पत्रकारांच्या आरोग्याची तपासणी करून त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले जातात. गंभीर आजाराचा रूग्ण सापडल्यास त्यास सर्व सेवा उपलब्ध असलेल्या मोठ्या रुग्णालयात पाठवून त्याच्यावर उपचार केले जातात. गेल्या वर्षी पत्रकार आरोग्य तपासणी शिबिरांना राज्यात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. राज्यातील २६५ तालुक्यात ही शिबिरं झाली होती. त्यात १० हजरांपेक्षा जास्त पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांची आरोग्य तपासणी करण्यात आली. हा जागतिक विक्रम होता. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनी म्हणजे ३ डिसेंबर २०२४ रोजी राज्यासह बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यात पत्रकार आरोग्य तपासणी शिबिरं घेण्यात येत आहेत. डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या सूचनेवरून, या शिबिरात डिजिटल मीडिया परिषदेच्या विविध तालुक्यातील सर्व पदाधिकारी आणि सदस्य यांनी सहभागी होऊन, स्थानिक तालुका पत्रकार संघाशी संपर्क साधून आपल्या आरोग्याची तपासणी करून घ्यावी असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले आहे.



# कुंडलवाडी शहरात आयप्पा स्वामी माळधारण कार्यक्रम संपन्न

**कुंडलवाडी । प्रतिनिधी**



शहरातील श्री विठ्ठल साई मंदिरात दरवर्षी प्रमाणे यावर्षीही आयप्पा स्वामी माळधारण कार्यक्रम दि.२५ नोव्हेंबर रोजी संपन्न झाले. यात शहरातील ५७ भक्तांनी माळधारण केले आहे.

कुंडलवाडी शहरात मोठ्या प्रमाणात आयप्पा स्वामी भक्त माळधारण करतात. त्यातच यावर्षी ५७ भक्तांनी माळधारण केले आहे. दि.२५ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर दरम्यान शहरातील श्री विठ्ठल साई मंदिरात पहाटे सुर्योदयापुर्वी आयप्पा स्वामी यांची पुजा करून माळधारण कार्यक्रम संपन्न झाला.यात ४१ दिवस आयप्पा स्वामी यांची सकाळ व संध्याकाळ पुजा करून माळधारण केलेले सर्व भक्त मकरसंक्रांतीच्या दिवशी केरळमधील शबरीमाला येथे आयप्पा स्वामीच्या दर्शनासाठी उपस्थित राहतात. शहरात २००३ वर्षी पासून कुंडलवाडी येथे श्री अय्यप्पा स्वामी चे माळ धारण कार्यक्रम चालू आहे विशेष म्हणजे श्री यु रमणाप्रसाद गुरुस्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली बरेच जण अय्यप्पा स्वामी चे माळ धारण करून व्यसनमुक्त होत आहेत. या माळधारण कालावधी असलेल्या ४१ दिवसात आयप्पा स्वामी पालखी मिरवणूक शहरात काढली जाते.तसेच महापडी पुजा हे कार्यक्रम होतात. ४१ दिवसाच्या दिनचर्येत पहाटे ४ वाजता उठणे व सुर्योदयापुर्वी आयप्पा स्वामींची पुजा करणे,दुपारी एक वेळेसच जेवन,सांयकाळी अल्पोपहार आणि रात्री सुर्यास्तानंतर पुजा असा दिवसभराचा कार्यक्रम आहे.आयप्पा स्वामी माळधारण मुळे शहरात ४१ दिवस भक्तीमय वातावरण असते व दर बुधवार व शनिवार पहाटे साडेचार वाजता श्री अय्यप्पा स्वामी ची महा अभिषेक केले जाते. या अभिषेकासाठी फार मोठे संख्येने भक्तगण उपस्थित असतात. ४१ दिवसाच्या माळधारण केल्यानंतर कुंडलवाडीचे आराध्य दैवत श्री कुंडलेश्वर मंदिर येथे इरुमुडी कार्यक्रम संपन्न होते.

### आ.राजेश पवार यांचा मंत्रिमंडळात समावेश व्हावा यासाठी

# गंगनबीड महादेव मंदिर येथे केला अभिषेक

**नायगांव । हानुमंत चंदनकर**



नायगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय कार्यसम्राट आमदार राजेश संभाजी पवार साहेब यांची मंत्रिमंडळात समावेश व्हावा यासाठी गंगनबीड येथील भारतीय जनता पार्टीच्या वतीने महादेव मंदिर येथे अभिषेक करण्यात आले त्यावेळी नायगाव तालुक्यातील आमदार राजेश पवार साहेब यांचे सर्व समर्थक भाजपा जेष्ठ नेते देविदास अण्णा बोमनाळे भाजपा तालुकाध्यक्ष दत्ता पाटील ढगे सावरखेडकर रणजित पाटील कुरे सरपंच माधवराव कोलगावे गजानन जुने भाजपा महिला मोर्चा तालुक अध्यक्ष जयश्रीताई नरवाडे भाजपा महिला मोर्चा नायगाव शहर अध्यक्ष पल्लवीताई वडजे शरद पाटील माहेगाव भाजपा युवा मोर्चा नायगाव शहर अध्यक्ष नायगाव राजु आप्पा बेळगे परमेश्वर पाटील सोमठाणकर श्रीराम पाटील सुगावे परमेश्वर पाटील कांडाळकर संभाजी मिस्से गोविंदराव उपासे प्रकाश पाटील हेडगे गजानन पाटील कांडाळकर माधव पाटील बेद्रीकर मारोती घंटेवाड बालाजी घोसलवाड नागेश मेटकर भास्कर पाटील बेलकर भगवान पाटील ढगे गजानन शिंदे बळीराम पाटील वडजे युवराज पाटील लालवंडीकर विजय गायकवाड कैलास येरेवाड योगेश जाधव यांच्या सह अनेक भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जागतिक एड्स दिनानिमित्ताने आयोजित प्रभात फेरीला युवकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद



**जालना । असलम कुरेशी**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शनानुसार दिनांक २ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा रुग्णालय जालना येथे जागतिक एड्स दिनानिमित्त प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. जालना येथील जिल्हा रुग्णालयात जागतिक एड्स दिनानिमित्त प्रभात फेरीचे उदघाट्न हिरवी झेंडी दाखवून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. रॅलीस युवकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. रॅलीची सुरवात जिल्हा रुग्णालय जालना येथून होऊन मार्ग सतकर कॉम्प्लेक्स, शनी मंदिर, गांधी चमन येथे समारोप करण्यात आला. याप्रसंगी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर यांच्यासह डापकु, एआरटी, आयसीटीसी, सुरक्षा क्लिनिक इत्यादी विभागातील कर्मचारी वर्ग, तसेच अशासकीय संस्था यांच्यासह परिचारिका प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थीनी व कनिष्ठ वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनी तसेच राज्य राखीव पोलिस दलाच्या बँड पथकासह पोलिस प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी पोलिसांची उपस्थिती होती.

# सुरेश रामचंद्र धस यांची मंत्रिपदी निवड करा शेतकरी उद्योग समूह महाराष्ट्र राज्य

**बीड । प्रतिनिधी**



विधानसभा निवडणुकीनंतर आता मंत्रिमंडळाचा विस्तार हालचालींना वेग झाला आहे

मंत्रिमंडळाच्या बैठकीत चालू असून लवकरच नवीन मंत्रिमंडळ जाहीर होण्याची शक्यता आहे या पार्श्वभूमीवर विधानसभा आमदार सुरेश रामचंद्र धस यांना मंत्री पद मिळावे, अशी मागणी शेतकरी उद्योग समूह महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष श्री पवन ढास पाटील यांनी केली आहे पवन ढास पाटील म्हणाले. सुरेश रामचंद्र धस यांनी आपली राजकीय कार्यकर्ती राज्याच्या विकासासाठी लावली व मोठे योगदान दिले त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक महत्वपूर्ण योजना राबवण्यात आल्या.

त्यामुळे त्यांना मंत्रिमंडळ स्थान देणे आवश्यक आहे सुरेश रामचंद्र धस बीड जिल्ह्यात प्रमुख नेता पैकी एक असून त्यांनी आतापर्यंतच्या राजकारणात भाजप पक्षासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आगामी मंत्रिमंडळाच्या विस्तारात त्यांच्या सहभागाबाबत आता राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे मंत्री पदाच्या निर्णयाबद्दल अंतिम निर्णय मुख्यमंत्री पक्ष श्रेटोच्या हातात असला तरी बीड सह महाराष्ट्रातील संघटना व अनेक कार्यकर्त्या अपेक्षा सुरेश रामचंद्र धस यांनी मंत्रिमंडळात पालकमंत्री मंत्रीपद मिळावे

# भाजपचाच मुख्यमंत्री तर दोन पक्षांचे दोन उपमुख्यमंत्री

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून सात दिवस झाले असले तरी अद्याप राज्यात सरकार स्थापन झालेले नाही. त्यामुळे अनेक तर्क वितर्क लावले जात आहेत. मात्र अजित पवार यांनी आता याबाबतच्या सुरू असलेल्या चर्चेला पूर्णविराम देत भाजपसोबत झालेल्या चर्चेचा सविस्तर तपशील सांगितला आहे. राज्यात भाजपचा मुख्यमंत्री होणार असल्याचे आमच्या बैठकीत निश्चित झाले असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. तसेच उर्वरित दोन पक्षाचे दोन उपमुख्यमंत्री असतील, हे देखील निश्चित झाले असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.एवढेच नाही तर राज्यात सरकार स्थापन होईल, त्याचवेळी राज्य मंत्री पदांच्या नावाची देखील घोषणा करणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. या माध्यमातून राज्य सरकार स्थापनेची सर्व चर्चा पूर्ण झाली असल्याचे संकेत अजित पवार यांनी दिले आहेत. मात्र भाजपचा मुख्यमंत्री कोण असेल याचा निर्णय हा भारतीय जनता पक्ष घेणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. भारतीय जनता पक्षाच्या बैठकीत याबाबत निर्णय होईल. त्यानंतर सरकार स्थापन केले जाईल, असे देखील पवारांनी सांगितले. महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे.

### भाजपने ठाकरेंसारखेच एकनाथ शिंदेंना फसवले

# माजी मुख्यमंत्र्याचा आरोप;पैसा अन् सत्तेच्या बळावर लोकशाही नष्ट करण्याचा प्रयत्न

**मुंबई (वृत्तसंस्था)**



भाजपने उद्धव ठाकरे यांच्यासारखीच एकनाथ शिंदे यांची फसवणूक केल्याचा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. भाजपकडून पैसा व सत्तेच्या बळावर लोकशाही नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, महायुतीने यंदाची विधानसभा निवडणूक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात लढवली. त्यामुळे शिंदे यांची फसवणूक होणार नाही अशी अपेक्षा होती. पण भाजपने त्यांची उद्धव ठाकरे यांच्यासारखीच फसवणूक केली. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत उद्धव यांची फसवणूक केली होती. त्याच पद्धतीने आता शिंदे यांना फसवण्यात आले. सत्ताधाऱ्यांकडून निवडणुकीत पैसा व सत्तेचा गैरवापर करून लोकशाही नष्ट करण्यात आली. सत्ताधाऱ्यांनी सत्तेचा गैरवापर करून पोलिसांच्या गाड्यांमधून पैसे वाटले. पण निवडणूक आयोगाने त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. त्याने केवळ बघ्याची भूमिका घेतली.

पृथ्वीराज चव्हाण यांनी यावेळी ईव्हीएमवरही संशय व्यक्त केला. ते म्हणाले, केंद्रीय निवडणूक आयोगाला स्वायत्तता आहे. सध्या मुक्त वातावरणात पारदर्शकपणे निवडणुका घेतल्याचा दावा केला जात आहे. पण त्यानंतरही जनतेच्या मनात ईव्हीएमविषयी संशय आहे. आयोगाला ईव्हीएम सुरक्षित वाटते, तर मग सर्व मतदान यंत्रे व व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांच्या मोजणीला किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील इलेक्ट्रॉनिक तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याला सरकार का घाबरते?

सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार ठराविक मतदान यंत्रांतील मतचिठ्ठ्यांची तपासणी झाली, तरी त्यातून काही निष्पन्न होणार नाही. कारण, ठराविक मतदान यंत्रांमधील डेटा नष्ट केला जाऊ शकतो, असे चव्हाण म्हणाले.पृथ्वीराज चव्हाण यांनी महायुतीवरही घणाघात केला. कोणत्याही निवडणुकीत जनतेचा विश्वास असणे अत्यंत गरजेचे आहे. पण जनतेला ईव्हीएमवर थोडाही विश्वास राहिला नाही. त्यामुळे जनतेतून पुन्हा एकदा बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याची मागणी होत आहे. लोकसभा निवडणुकीत जनतेने केंद्रातील भाजपा सरकारवर तीव्र नाराजी दर्शवली. पण त्यानंतर अवघ्या ४ महिन्यांत अचानक मतदारांच्या मनात एवढा बदल होऊन भाजप महायुती सरकारविषयी एवढा विश्वास संपादन होणे ही अशक्य व अविश्वसनीय गोष्ट आहे, असे ते म्हणाले.

# फळ बाग लागवड धारकांना वाढीव पीकविमा मुदत मिळण्याची मागणी



**पालघर । सौरभ कामडी**

जव्हार: निसर्गाने मुक्त हस्ताने रंगांची उधळण करीत जव्हारचे सृष्टी सौंदर्य वाढविले, येथील थंड हवामान विशेष प्रसिद्ध आहे.या भागात शासनाच्या, सामाजिक संस्थांच्या कल्याणकारी योजना येथील शेतीमध्ये आमुलाग्र बदल करीत आहे. मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे उत्पन्न तथा पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते, त्यामुळे जव्हार तालुक्यातील फळबाग लागवड धारकांना पीक विम्याची मुदत वाढवून मिळावी अशी मागणी जव्हार तालुका बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष एकनाथ दरोडा यांनी जव्हार तहसीलदारांना सोमवारी दुपारी १२ वाजता निवेदनाद्वारे केली आहे.

तालुक्यात आंबा , काजू आणि इतर फळ पिके अशी फळबाग लागवड करणारे ३४१० शेतकरी असून एकूण १७६७ हेक्टर क्षेत्र आहे.त्यापैकी पिक विमा अर्ज सादर करताना काही शेतकऱ्यांना इंटरनेट, सर्वर तसेच विद्युत पुरवठा खंडित होणे अशा काही समस्या उद्भवल्या होत्या, दरम्यान पिक विमा भरण्यासाठी ३० नोव्हेंबर अखेरची मुदत असल्याने तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचे पीक विमा भरणे पूर्ण झाले नाही, तथापि या योजनेला मुदतवाढ देऊन येथील आदिवासी तथा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शासनाने मदतीचा हात द्यावा असे दरोडा यांनी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## आ.संदीप क्षीरसागरांचा बीडकरांकडून अभूतपूर्व नागरी सत्कार

# बीडकरांनी मला कधीच एकटे पडू दिले नाही, सगळे बीड माझे कुटुंब-आ.संदीप क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या मायबाप जनतेने मला कधीही एकटे पडू दिले नाही. सगळे बीडच माझे कुटुंब आहे. जनसमान्यांच्या आशिर्वादानेच मी दुसर्यांदा आमदार झालो असून त्यांच्यासाठी पूर्णवेळ उपलब्ध असेन असे आ.संदीप क्षीरसागर यांनी त्यांच्या नागरी सत्कार सोहळ्यात व्यक्त होताना सांगितले. रविवारी (दि.१) रोजी नागरी सत्कार समितीच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांचा, दुसर्यांदा आमदार पदी निवडून आल्याबद्दल सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी ते बोलत होते.

रविवार (दि.१) रोजी बीड शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे नागरी सत्कार समिती, बीड यांच्या आयोजनाने सलग दुसर्यांदा विधानसभा सदस्यपदी निवडून आल्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांचा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी समस्त बीडकरांच्या वतीने आ.क्षीरसागर यांचा अभूतपूर्व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आ.संदीप क्षीरसागर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. निवडणुकीत आपल्याकडे शेकडो प्रवेश झाले. परंतु हे प्रवेश कसल्याही अटी आणि शर्ती विना झाले. विरोधकांनी निवडणूक काळात अक्षरशः पैशांचा बाजार मांडला होता. परंतु बीडच्या जनतेने भूमिकेशी तडजोड न करता एकनिष्ठ राहिल्याने माझी साथ दिली. आता मला माझ्या बीडकरांनी निवडून दिले आहे. मी दुसर्यांदा आमदार झालो आहे. परंतु काही लोकांचा प्रश्न आहे, आता आपण सत्तेत नाही मग परत आपल्याला निधी मिळणार नाही! पण आता या गोष्टीची काळजी करायची गरज नाही. मागील तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भाजपा सरकारने अडवून धरलेल्या आहेत. आता या निवडणुका होणार आहेत. या निवडणुका होऊन प्रशासक राज जेव्हा हटेल तेव्हा लोक निहाय निधी स्थानिक स्वराज्य संस्थांना देणे अनिवार्य असते. सत्ताधाऱ्यांचा त्यातील एक रूपयाही कमी करता येत नाही. त्यामुळे आता विकास कामे आणि निधी यांची चिंता करण्याची कसलीही गरज नसल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी यावेळी सांगितले. यासोबतच मी अगोदरच सांगुन टाकले आहे की, 'जरांगे पाटील म्हणतील तसं...' असे सांगत मराठा आरक्षणाबाबत आपली स्पष्ट आणि उघड भूमिका



असल्याचेही आ.क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. त्याबरोबरच पत्नी नेहाताई क्षीरसागर आणि बंधू अर्जून क्षीरसागर यांनीही निवडणूक काळात साथ दिल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमास प्रामुख्याने खा.बजरंग सोनवणे, माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.सुनील धांडे, माजी आ.उषाताई दराडे, कॉंग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते रविंद्र दळवी, राजेंद्र मस्के, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, उदयसिंह जी देशमुख, जेष्ठ विधीज्ञ ड.बाळासाहेब कोल्हे, जेष्ठ नेते डी.बी.बागल, आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद खमरूल, अखिल मौलाना साहेब, इक्बाल मौलाना साहेब, ऑल इंडिया ओबीसी ऑर्गनायझेशनचे बीड जिल्हाध्यक्ष हाजी शेख जाकेर महेबुब यांच्यासह त्यांच्या संघटनेचे पदाधिकारी, जेष्ठ विधीज्ञ ड.विवेकानंद सानप, वैजनाथ नाना तांदळे, खुर्शीद आलम यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते, महाविकास आघाडीतील सर्व मित्र पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि बीड शहर, ग्रामीण एकूण मतदारसंघातील सर्व भागातून बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संदीपभैय्यांना व्हिजन नसते तर बीडकरांनी त्यांना दुसर्यांदा निवडून दिले असते का?-खा.बजरंग सोनवणे

**संदीपभैय्यांचे विरोधक पत्रकार परिषद घेऊन विचारत आहेत की, संदीपभैय्यांनी त्यांचे व्हीजन काय ते सांगावे. आता हा प्रश्न विचारण्याचा अधिकार केवळ बीडच्या जनतेला आहे. परंतु तरीही मी एक प्रश्न त्या विरोधकांना विचारू इच्छितो, जर संदीपभैय्यांकडे व्हीजन नसते तर बीडकरांनी त्यांना सलग दुसऱ्यांदा निवडून आणुन आमदार केले असते का? असा सवाल खा.बजरंग सोनवणेंनी या कार्यक्रमातून विरोधकांना केला. बीडकरांनी दुसर्यांदा वाघ विधानसभेत पाठवला आहे. हा खासदार बजरंग सोनवणे कायम तुमच्यासोबत त्यामुळे काळजी करण्याची गरज नाही. संदीपभैय्यांच्या रूपाने पवार साहेबांच्या राष्ट्रवादीचा झेंडा बीडमध्ये फडकला आहे. असे खा.बजरंग सोनवणे यांनी या कार्यक्रमात बोलताना म्हटले.**

# ज्वारी-बाजरीची भाकर वांग्याच्या भरताला पसंती

**विहामांडवा । प्रतिनिधी**

हिवाळा आरोग्यासाठी उत्तम ऋतू मानला जातो. लोकसुद्धा चांगल्या आरोग्यासाठी सकाळी फिरणे, मार्निंग वॉकला जाणे, जेवनात सकस, पौष्टिक आहाराला महत्त्व देतात. ज्वारी किंवा बाजरीची भाकर पचायला हलकी व त्यात शरीरास आवश्यक घटक असतात. भाकरीसोबत वांग्याचा भरीत स्वादिष्ट व्यंजन आहे. हिवाळ्यात आरोग्याच्या दृष्टिने नागरिक ज्वारी, बाजरीची भाकर ववांग्याच्या भरताला अधिक पसंती देतात. यामुळे धान्य बाजारात ज्वारी, बाजरी आणि भाजी बाजारात वांग्याची मागणी वाढली आहे.ज्वारीत पोटॅशियम, मॅग्नेशियम सारखे महत्वाचे घटक आहेत. रक्तदाब नियंत्रणात ठेण्यास मदत मिळते. बाजरीत गव्हाच्या चपातीपेक्षा कॅलरीज कमी असतात. वजन वाढत नाही. बाजरी उष्ण असते. थंडीतशरीरातऊर्जा निर्माण करते. पचनास हलकी आहे. याच बाबी ज्वारीमध्ये आढळतत. त्यामुळे हिवाळ्यात नागरिक बाजरी व ज्वारीच्या भाकरीसोबत वांग्याच्या भरताला अधिकच पसंती



देतात. बाजरीचे उत्पादन प्रामुख्याने राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटकच्या काही भागात होते. ज्वारीच्या तुलनेत बाजरीचे दर कमी आहे. बाजारात बाजरीला अधिक मागणी आहे.

बाजरी महिलांसाठी पौष्टिक आहे. स्त्रियांमध्ये मासिक पाळी नियमित येण्यास मदत होते तर प्रसूती व बाळंतपणात पौष्टिक दूध तयार होण्यास उपयुक्त ठरते. बाजरी नियमित खाल्ल्याने मानसिक ताण कमी होण्यास मदत होते. झोप शांत लागते.हिवाळ्यात शरीरात ऊर्जा निर्माण करते. बाजरी प्रकृतीने उष्ण, पचायला हलकी व चवीला रुचकर व पौष्टिक आहे. कर्बोदके, प्रथिने व तंतुमय पदार्थाचे योग्य प्रमाण असते. लवकर भूक लागत नाही. वजन नियंत्रित ठेवण्यात उपयुक्त आहे. फॉलिक ॲसिड व सत्व, कॅल्शियम, लोह, पोट्याशियम, मॅग्नेशियम सारखी अनेक जीवनसत्त्वे व खनिजे द्रव्याने बाजरी भरपूर आहे.

# पूरग्रस्तांच्या थकीत अनुदाणासाठी सीटूचा तहसीलदार यांना घेराव

**नांदेड । प्रतिनिधी**

मागील वर्षाचे पूरग्रस्तांना मंजूर अनुदान मिळाले नाही ही बाब खुप गंभीर आहे परंतु महापालिका आणि तहसील प्रशासनास शुल्लक वाटते.

ज्या क्षेत्रीय अधिकाऱ्याच्या विरोधात अनेक तक्रारी आहेत त्यांना मनपा उपायुक्त म्हणून पदोन्नती देण्यात येते हे मनपाचे उदारमतवादी धोरण असून बेजबाबदारपने किंवा वशिलेबाजीने घेतल्याचा आरोप सीटूचे जनरल सेक्रेटरी कॉ.गंगाधर गायकवाड यांनी केला असून दोषींवर कठोर कारवाई करावी या आणि इतर मागण्यासाठी दि.२ डिसेंबर रोजी तहसीलदार यांना घेराव घेराव घालून विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले.

क्षेत्रीय कार्यालय चार चे अधिकारी श्री संजय जाधव यांना वशिलेबाजीने उपायुक्त म्हणून पदोन्नती दिली असून ती तात्काळ रद्द करावी ही मागणी घेऊन मनपा समोर दि.२७ नोव्हेंबर पासून आमरण उपोषण सुरु केले असून




दखल घेण्यात येत नसल्याने घेराव आंदोलन करण्यात आले आहे. तातडीने योग्य आणि कठोर कारवाई आयुक्त यांनी केली आहे नाहीतर ९ डिसेंबर रोजी मनपा आयुक्त यांना घेराव घालण्यात येणार आहे. घेराव आंदोलनात मोठ्या संख्येने महिला पुरुष सामील झाले होते. पुढील आंदोलन आक्रमक होणार होणार असल्याचा इशारा सीटूच्या वतीने देण्यात आला आहे. या आंदोलनाचे नेतृत्व कॉ.गंगाधर गायकवाड, कॉ.उज्वला पडलवार, कॉ.करवंदा गायकवाड, कॉ.लता गायकवाड, कॉ. श्याम सरोदे, कॉ. जयराज गायकवाड, कॉ. नवनाथ सावंत,कॉ.संभाजी सावते आदींनी केले आहे.

## स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज व राजर्षी शाहू विद्या मंदिर केज तर्फे आयोजीत

# महात्मा ज्योतिबा फूले स्मृती दिनानिमित्त आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

## चांगले काम करणाऱ्या शिक्षकांना बळ देण्याचं काम संस्थेने केले-लक्ष्मणराव बेडसकर

**केज । शेख सज्जाद**

स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज व राजर्षी शाहू विद्या मंदिर केज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय व उपक्रमशिल कार्य करणाऱ्या शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. केज येथील गटसाधन केंद्राच्या सभागृहात दि. ३० नोव्हेंबर वार शनिवार रोजी हा पुरस्कार वितरण सोहळा अत्यंत हर्षोत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष मा.श्री.राहुल राजेसाहेब देशमुख अध्यक्ष- स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज तर प्रमुख पाहुणे म्हणून केजचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी मा.श्री.लक्ष्मणराव बेडसकर तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये मा.श्री.जी.बी.गदळे सर सचिव, स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज तसेच श्रीमती चाटे बी.बी मुख्याध्यापिका राजर्षी शाहू विद्या मंदिर केज यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या सुरुवातीस आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज व शेतकऱ्यांचा कनवाळा असणारे,शिक्षणाचा प्रचार करणारे समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फूले यांना अभिवादन करण्यात आले.यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय संस्थेचे सचिव श्री.जी.बी.गदळे यांनी दिला.यावेळी संस्थेच्या व




शाळेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची थोडक्यात माहिती सांगितली.कार्यक्रमाच्या पुढील सत्रात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सर्व सत्कारमुर्तींचा शाल,पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये-प्रा.डॉ.नवनाथ गंगाधर काशिद बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज,श्री.हरिदास अर्जुन शिंदे सरस्वती महाविद्यालय केज, श्री.सय्यद जफर सय्यद जाकेर, जि.प.प्रा.शा.अल्लाउद्दीन नगर केज,श्री.अनंत निवृत्तीराव गवळी, कानेश्वर विद्यालय कानडी माळी,श्री.शिवकुमार सोमनाथ कोरसळे, जि.प.कें.प्रा.शा.लहुरी. सत्कार वितरण सोहळ्यानंतर प्रातिनिधिक स्वरूपात सत्कारमूर्ती प्रा.डॉ.नवनाथ काशिद यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.भेंडीच्या बाबतीत संशोधन करून भेंडीमधील फायबर व तिचा हिरवा रंग जास्त दिवस राहावे यासाठी त्यांना पेटंट मिळाले आहे यासाठी त्यांचा सत्कार झाला.विद्यार्थ्यांशी संवाद साधताना विद्यार्थ्यांनी नेहमी जाणून घेण्याच्या प्रक्रियेत राहीलं पाहिजे जिज्ञासूपणे गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत.शैक्षणिक माध्यमातून पुरस्कार मिळणे आनंददायी आहे असं ते म्हणाले.याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक गटशिक्षणाधिकारी मा.श्री.लक्ष्मणराव बेडसकर यांनी शैक्षणिक, सामाजिक परिस्थितीचे वास्तव विद्यार्थ्यांपुढे मांडले.आपल्या परिसरात सामाजिक उपक्रमांची कमतरता आहे अशा परिस्थितीत स्वामी दयानंद प्रतिष्ठान कडून राबविण्यात येणारे उपक्रम हे शिक्षकांना बळ देण्याचं काम करतात असे प्रतिपादन त्यांनी केले. चांगले काम करणाऱ्या शिक्षकांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याचं महत्वाच काम आपल्या माध्यमातून होत आहे अशा उपक्रमात माझी तुम्हाला नेहमीच साथ असेल असं ते म्हणाले.याप्रसंगी बोलताना संस्थेचे अध्यक्ष राहुल देशमुख म्हणाले, आजच्या सर्व आदर्श शिक्षकांनी पुढील आयुष्यामध्ये विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी अजूनही अथक परिश्रम घेऊन कार्य केले पाहिजे.पुरस्कार प्राप्त सर्वांचे अभिनंदन करत त्यांनी उपस्थिती बद्दल सर्व मान्यवरांचे आभार मानले.कार्यक्रमाचे प्रेरणादायी सुत्रसंचलन श्री.हनुमंत घाडगे यांनी केले तर आभार शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री.विष्णू यादव यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री.देशमुख ए.डी,श्री.क्षीरसागर आर.एस,श्री.डिरंगे जी.बी,श्री.मस्के जे.आर,श्रीमती जाधव मॅडम व श्रीमती गायकवाड मॅडम यांनी मोलाचे सहकार्य केले.यावेळी विद्यार्थी,पालक व हितचिंतक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077